# अशोकराव माने फार्मसी महाविद्यालयाचे लर्निंग फ्रॉम होम या उपक्रमास विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद

April 12, 2020 • वृत्तपत्र द वाळवा क्रांती

अशोकराव माने फार्मसी महाविद्यालयाचे लर्निंग फ्रॉम होम या उपक्रमास विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद



vivo 1907
Manasvi patil
Snehankita
From komal lahamate to All
Sneha Ketkale
ANIRUDHA KADAM
Omkar Suryawanshi
sushant khamkar
Rajanikant Ghotane
realme 5 pro
Sapna Zine
Dipali sawant




टा◌ेप -  नंदकुमार सांळुखे

महाविद्यालयात परीक्षेचा माहोल नुकताच तयार होत असताना कोरोना संसर्ग संख्येत वाढ झाल्याने देशात संचारबंदी लागू झाली. चालत्या गाडीला अचानक ब्रेक लागल्यावर जसे धक्का बसतो तसे झाले. अशा आपत्तीतही विधायक संधी शोधणाऱ्या पेठवडगाव येथील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात कोरोनामुळे निर्माण झालेल्या भयग्रस्त वातावरणात विद्यार्थ्यांचे हित जोपासत आहे. राज्य सरकारने महाविद्यालयांना सुट्टी दिली असले तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विविध ॲप्लिकेशनचा वापर करीत महाविद्यालयाचे दररोज ऑनलाईन शाळा भरू लागली आहे. महाविद्यालयाचे ऑनलाईन ॲप्स चा वापर करून घरबसल्या विद्यार्थ्यांचे दररोज वर्ग घेतले जात आहेत. याचबरोबर ऑनलाइन संसाधनाचा (स्वयम्) अध्ययनासाठी स्वतः प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी वापर करणे, झूम एप्लीकेशन यासारख्या ऑनलाईन व्हिडिओ एडिटिंग प्रणालीचा वापर करून प्राध्यापकांनी विशेष निहाय व्हिडिओ क्लिप तयार करून विद्यार्थ्यांना

पुरवणे, व्हाट्सअप समूहाद्वारे नेमून दिलेले कार्य (असाइनमेंट) पूर्ण करून घेणे. विद्यार्थ्यांचे समस्याचे निरसन करणे, प्रश्नावलीचे बँक तयार करणे असे अनेक ऑनलाईन पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जास्तीत जास्त ऑनलाईन वापर करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे यासाठी सर्व प्राध्यापक वर्ग प्रयत्न करीत आहेत.कोरोनामुळे  परीक्षेला देखील विद्यार्थ्यांना घराबाहेर पडावे लागू नये यासाठी ऑनलाईन टेस्ट घेण्यात येत आहेत.
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. एस. पाटील म्हणाले की ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी महाविद्यालयाने  व्हीएम एडूलाइफ या संस्थेबरोबर सोबत सामंजस्य करार झाला आहे. तसेच आमचे शिक्षक घरी बसून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करीत आहेत ते झूम, युट्युब ॲप द्वारे विद्यार्थ्यांचे वर्ग घेत आहेत. महाविद्यालयाचे वेळापत्रकानुसार त्यांच्या विषयाचे धडे त्यांना दिले जात आहेत. विद्यार्थी पालकाकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.
या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री विजयसिंह माने, कार्याध्यक्ष मा. श्री विकासराव माने व जिल्हा परिषद सदस्या मा. सौ. मनिषा माने यांचे मार्गदर्शन लाभले.